# नियमित दिवाणी दावा क. १३६/२०१० मधील निशाणी २३ वरील आदेश

( सुखदेव इंदलकर वि. सोपान इंदलकर )

१. वादींनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश—६, नियम—१७ अन्वये दाखल केलेला आहे.

अर्जाची थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे :—

२. वादींनी मौजे टेकवडी ता. पुरंदर जि. पुणे येथील गट नं. ३६२ पैकी १५ आर क्षेत्राचा ताबा मिळणेसाठी दिलेला दावा प्रलंबित आहे. प्रतिवादींनी दाव्यास कैफियत देवून दावा मिळकतीच्या वर्णनाबाबत आक्षेप घेतलेला आहे. वादींनी दावा दाखल करतेवेळी मोजणी रजिस्टर नं. १२४७ ची 'क' प्रत दाखल केली आहे. वादी अतिक्रमित क्षेत्राच्या चतु:सिमा दाव्यात नमुद करण्याची परवानगी मागत आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार, सदर दुरुस्ती किरकोळ स्वरुपाची असून त्यामुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होणार नाही. त्यांनी शेवटी अर्ज मंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

३. प्रतिवादींनी अर्जावर म्हणणे देवुन सदर अर्जास जोरदार हरकत घेतलेली आहे. प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार, अर्ज खरा, प्रामाणिकपणाचा व कायदेशीर नसुन त्यांना मान्य नाही. प्रतिवादींनी दिनांक २३/११/२०१० रोजी कैफियत दाखल केली आहे. वादींनी सदर अर्ज खूप उशीरा दाखल केलेला आहे. दावा पुरावा देण्यासाठी प्रलंबित आहे. वादी दाव्याचे कामकाज विनाकारण लांबवत आहेत. त्यांनी शेवटी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. सदर दावा मौजे टेकवडे येथील गट नं. ३६२ मधील १५ आर क्षेत्रावरील अतिक्रमण कढून मिळणेकामी दाखल केलेला आहे. वादींनी दावा कलम—१

मध्ये संपूर्ण गट नं. ३६२ च्या चतु:सिमा दिलेल्या आहेत. त्यांनी अतिक्रमित क्षेत्राच्या चतु:सिमा नमुद केलेल्या नाहीत. वादी सदर १५ आर अतिक्रमित क्षेत्राच्या सिमा दाव्यात समाविष्ट करण्याची परवानगी मागत आहेत.

५. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश—६ नियम १७ प्रमाणे कोणताही पक्षकार दाव्याच्या कोणत्याही स्थितीत आपल्या कथनामध्ये दुरुस्ती करु शकतो. सदर तरतूदीच्या परंतुकामध्ये एखाद्या पक्षकाराने सावधानता बाळगूनही जर त्यास सुनावणी सुरु होण्यापूर्वी दुरुस्ती अर्ज देणे शक्य झाले नसल्यास तो पक्षकार सुनावणीस सुरुवात झाल्यानंतरही दुरुस्ती अर्ज देवू शकतो असे नमुद केलेले आहे.

६. सदर दाव्यामध्ये दिनांक ०५/०६/२०१७ रोजी वाद मुद्दे निश्चित केलेले आहेत. यावरुन दाव्याच्या सुनावणीस सुरुवात झालेली आहे असे दिसून येते. वादींनी त्यांचा पुरावा दिलेला नाही. वादींनी निशाणी १४ वर न्यायालयीन आयुक्तांमार्फत दावा मिळकतीची मोजणी करण्यासाठी दिलेला अर्ज नामंजुर करण्यात आलेला आहे. वादींनी मोरक्र. १२४७/२००८ च्या मोजणी नकाशाची ‘क’ प्रत सादर केलेली आहे. वादी सदर नकाशामधील चतु:सिमा दाव्यात नमुद करण्याची परवानगी मागत आहे.

७. प्रतिवादींनी कलम—३ मध्ये दावा मिळकतीच्या वर्णनाबाबतचा स्पष्ट बचाव घेतलेला आहे. त्यांनी दावा मिळकतीचे वर्णन बरोबर आहे परंतु दावा विषय असलेल्या मिळकतीचे वर्णन दिलेले नाही असे कथन केले आहे. यावरुन दावा मिळकतीवरील तथाकथित अतिक्रमित क्षेत्राचे वर्णन दिलेले नाही हा प्रतिवादींचा बचाव असल्याचे स्पष्ट होते. वादी सदर दुरुस्ती यापूर्वीही करु शकले असते. परंतु त्यांनी सदर दुरुस्ती करण्यास उशीर केलेला आहे.

८. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश—७ मधील तरतूदीप्रमाणे दावा

मिळकतीचे वर्णन योग्यप्रकारे करणे आवश्यक आहे. सदर दुरुस्ती किरकोळ स्वरुपाची असून त्यामुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात केणताही बदल होणार नाही. वादीने सदर दुरुस्ती अर्ज उशीरा का दिला याचे कोणतेही स्पष्टीकरण दिले नाही. परंतु केवळ दावा दुरुस्तीचा अर्ज उशीरा दिला या कारणावरुन तो नामंजुर करणे योग्य होणार नाही. सदर दुरुस्ती उभयपक्षातील वाद विषय एकाचवेळी निकाली काढण्यास उपयोगाची ठरणार आहे. वादींनी दुरुस्ती अर्ज दाखल करण्यास केलेल्या उशीराबाबत त्यांचेवर काही खर्च लादणे आवश्यक आहे. सबब, वरील सर्व विवेचनावरुन मी खालील आदेश पारित करत आहे...

## आदेश

१. अर्ज निशाणी–२३ वादींनी प्रतिवादींना खर्च रु. ५००/– देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. वादींनी पुढील तारखेदिवशी किंवा त्यापुर्वी दाव्यात प्रस्तावित दुरूस्ती करून दुरूस्त दाव्याच्या प्रती सादर कराव्यात.

दिनांक : ०५/१०/२०१८ ( वैभव क. जाधव )
ठिकाण : सासवड दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सासवड.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order are same word for word as per original order.

Name of Steno: G. S.Chougule, Steno L.G.
Name of Court : Shri. V.K. Jadhav.
CJJD, Saswad.
Date : 05/10/2018

Order signed by Presiding Officer on : 05/10/2018

Order uploaded on : 12/10/2018

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file order are same word for word as per original order.

Name of Steno: G. S.Chougule, Steno L.G.
Name of Court : Shri. V.K. Jadhav.

CJJD, Saswad.
Date : 31/07/2018

Order signed by Presiding Officer on : 31/07/2018

**Order uploaded on : 02/08/2018**